UPSC/MPSC राजपत्रित नागरी सेवा पूर्व परीक्षा (राज्यसेवा/अभियांत्रिकी/कृषीसेवा/वनसेवा),
राज्यसेवा मुख्य परीक्षा, अराजपत्रित गट ब व क संयुक्त पूर्व व मुख्य परीक्षा
(PSI/STI/ASO/SR/II/EX.SI/TAX ASST/CLERK/TECH.ASST/AMVI)
तसेच इतर सर्व सरळसेवा परीक्षा व स्पर्धा परिक्षांकरिता उपयुक्त

# भारतीय अर्थव्यवस्था

## परिपूर्ण Revision Notes


By

Ranjan Kolambe



भगीरथ IAS Academy UPSC • MPSC

भगीरथ प्रकाशन, पुणे


# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरणाचे नाव | पेज नंबर |
|---|---|---|
| 1 | मूलभूत संकल्पना | 7 |
| 2 | राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप | 10 |
| 3 | आर्थिक वृद्धी, आर्थिक विकास व समावेशी वृद्धी | 19 |
| 4 | मानव विकास | 21 |
| 5 | सहस्त्रक विकास ध्येये व शाश्वत विकाय ध्येये | 37 |
| 6 | शाश्वत विकास | 39 |
| 7 | आर्थिक नियोजन | 41 |
| 8 | दारिद्र्य | 51 |
| 9 | रोजगार व बेरोजगारी | 62 |
| 10 | दारिद्र्य निर्मूलन व रोजगार निर्मिती योजना | 67 |
| 11 | लोकसंख्या | 73 |
| 12 | समावेशन | 79 |
| 13 | भारतातील आर्थिक सुधारणा | 81 |
| 14 | भारतीय वित्तीय व्यवस्था | 88 |
| 15 | भारतीय व्यापारी बँक व्यवस्था | 89 |
| 16 | भारतीय सहकारी बँक व्यवसाय | 100 |
| 17 | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) | 102 |
| 18 | भारतीय चलन व्यवस्था | 111 |
| 19 | चलनवाढ | 114 |
| 20 | भारताचा आयात-निर्यात व्यापार | 118 |
| 21 | व्यापारतोल व व्यवहारतोल | 127 |
| 22 | आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा संस्था | 132 |
| 23 | जागतिक व्यापार संघटना | 136 |
| 24 | सार्वजनिक वित्त | 142 |
| 25 | लेखा व लेखापरीक्षण | 155 |
| 26 | भारतीय करसंरचना | 160 |
| 27 | कृषी क्षेत्र | 170 |
| 28 | उद्योग क्षेत्र | 184 |
| 29 | सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र | 188 |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 30 | अर्थसंकल्प व आर्थिक पाहणी अहवाल | 191 |
| 31 | IMP PYQ Facts | 201 |
| 32 | Current Updates | 216 |






# 1 मूलभूत संकल्पना

| अर्थशास्त्र (Economics) | |
|---|---|
| संज्ञा | 'Economics' हा शब्द 'Oikonomikos' या ग्रिक शब्दावरून आलेला आहे. त्यामधील 'Oikos' म्हणजे कुटुंब, तर 'Nemein' म्हणजे व्यवस्थापन/प्रथा/कायदा होय. यावरून 'Economics' म्हणजे 'management of the housholds' असे म्हणता येईल. |
| शाखा | अर्थशास्त्राच्या दोन शाखा आहेत: सूक्ष्म अर्थशास्त्र (Microeconomics) व समग्रलक्षी अर्थशास्त्र (Macroeconomics) |

| | सूक्ष्म अर्थशास्त्र | समग्रलक्षी अर्थशास्त्र |
|---|---|---|
| अर्थ | ■ वैयक्तिक एककांच्या (कुटुंब/फर्म/फॅक्टरी) आर्थिक कृतींचा अभ्यास<br>■ व्यावसायिक संस्था वेगवेगळ्या बाजार परिस्थितींमध्ये कशाप्रकारे कार्य करतात याचा अभ्यास<br>■ खरेदीदार व विक्रेते यांच्या एकत्रित कृतींमुळे किंमत निर्धारणाचा अभ्यास | ■ संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास |
| समावेश | ■ मागणी, पुरवठा, घटक किंमती, वस्तूंच्या किंमती, उत्पादन, उपभोग, आर्थिक कल्याण इ. | ■ राष्ट्रीय उत्पन्न, आर्थिक वृद्धी, वितरण, दारिद्र्य, रोजगार व बेराजगारी, व्यापार चक्रे, सामान्य किंमत पातळी, चलन इ. |
| उपयोजन | ■ वैयक्तिक ग्राहक व उत्पादकांच्या अपेक्षा इष्टमत करण्याशी (optimization) संबंधित | ■ संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या वृद्धी प्रक्रियेच्या इष्टमताशी संबंधित |
| महत्व | ■ किंमत सिद्धांतासाठी प्रसिद्ध – उत्पादनाचे घटक तसेच उत्पादित वस्तू यांच्या किंमत निर्धारणासाठी उपयुक्त | ■ उत्पन्न सिद्धांतासाठी प्रसिद्ध – व्यापक किंमत स्थैर्य राखण्यासाठी उपयुक्त, तसेच चलनवाढ, मंदी, बेराजगारी, दारिद्र्य इ. आव्हाने हाताळण्यासाठी उपयुक्त |

## अर्थव्यवस्थांचे प्रकार




| | भांडवलशाही अर्थव्यवस्था | समाजवादी अर्थव्यवस्था | मिश्र अर्थव्यवस्था |
|---|---|---|---|
| उत्पादनाच्या घटकांची मालकी | खाजगी मालकी | सार्वजनिक मालकी | खाजगी + सार्वजनिक मालकी |
| आर्थिक उद्देश | नफा | सामाजिक कल्याण | सामाजिक कल्याण + नफा उद्दिष्ट |
| केंद्रीय समस्यांचे समाधान | मुक्त बाजार व्यवस्थेद्वारे | केंद्रीय नियोजन व्यवस्थेद्वारे | केंद्रीय नियोजन व्यवस्था +मुक्त बाजार व्यवस्था |
| किंमत व्यवस्था | बाजार शक्तींद्वारे | सरकारद्वारे | बाजार शक्ती + सरकारद्वारे |
| ग्राहकांची भूमिका | सार्वभौम असतात | सार्वभौम नसतात | मर्यादित सार्वभौमत्व |

# 2 राष्ट्रीय उत्पन्नाची मोजमाप

## मूलभूत संकल्पना

| | |
|---|---|
| **घटक उत्पन्न (Factor incomes)** | **उत्पादनाच्या घटकांना (भूमी, श्रम, भांडवल व उद्योजकता) मालकांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाला घटक उत्पन्न असे म्हणतात.**<br>■ भूमीला खंडाच्या (rent) स्वरूपात,<br>■ श्रमाला मजुरीच्या (wages) स्वरूपात,<br>■ भांडवलाला व्याजाच्या (interest) स्वरूपात,<br>■ उद्योजकाला नफ्याच्या (profit) स्वरूपात |
| **गैर–घटक उत्पन्न (Non-factor incomes)** | **कोणत्याही प्रकारचे काम/त्याग न करता प्राप्त होणाऱ्या उत्पन्नास गैर–घटक उत्पन्न म्हणतात.**<br>■ उदा. भेट, देणग्या, डोनेशन, धर्मदायिक देणग्या, कर, दंड इत्यादी.<br>■ त्याला 'हस्तांतरित उत्पन्न' (transfer incomes) असेही म्हणतात, कारण यात केवळ पैशाचे हस्तांतरण होत असते, उत्पन्नाच्या मोबदल्यात कोणत्याही वस्तू-सेवेची निर्मिती होत नाही.<br>■ राष्ट्रीय उत्पन्न मोजमापामध्ये केवळ घटक उत्पन्नाचा विचार केला जातो, गैर–घटक उत्पन्नाचा विचार केला जात नाही. |
| **आर्थिक (देशांतर्गत) प्रक्षेत्र (Economic (Domestic) Territory)** | ■ देशाचा भौगोलिक प्रदेश आणि आर्थिक/देशांतर्गत प्रक्षेत्र या भिन्न संकल्पना आहेत.<br>■ **संयुक्त राष्ट्राच्या मते,** ''आर्थिक/देशांतर्गत प्रक्षेत्र म्हणजे देशाच्या सरकारमार्फत प्रशासित केला जाणारा असा सर्व भौगोलिक प्रदेश ज्यात व्यक्ती, वस्तू व भांडवलाचा मुक्त प्रवाह असतो.''<br>■ **भारताच्या आर्थिक/देशांतर्गत प्रदेशात पुढील बाबींचा समावेश होतो:**<br>**भारताचे आर्थिक प्रक्षेत्र =** भारताचे भौगोलिक क्षेत्र<br>+ भारताची परदेशातील दुतावास व संबंधित सरकारी कार्यालये<br>– भारतातील सर्व परदेशी दुतावास व आंतरराष्ट्रीय संघटनांची कार्यालये<br>+ भारताचा भूप्रादेशिक सागरीप्रदेश<br>+ भारतीय निवासींच्या मालकीची व इतर दोन किंवा अधिक देशांदरम्यान वापरली जाणारी जहाजे व विमाने.<br>+ भारतीय निवासींच्या मालकीची आंतरराष्ट्रीय सागरीप्रदेशात कार्य करणारी मासेमारी जहाजे, तेल व वायू उत्खनन जहाजे इत्यादी.<br>■ देशाच्या आर्थिक प्रक्षेत्रात निर्माण होणाऱ्या एकूण उत्पन्नाला मिळून त्या देशाचे देशांतर्गत उत्पन्न समजले जाते. |
| **निवासी (Residents)** | निवासी व नागरिक या दोन भिन्न संज्ञा आहेत. भारताचा नागरिक भारताचा निवासी असेलच असे नाही.<br>**निवासी:** देशात राहणारे नागरिक तसेच परकीय व्यक्ती (एक वर्षापेक्षा अधिक काळासाठी राहणारे) यांना मिळून निवासी असे संबोधले जाते.<br>**अनिवासी:** परदेशात राहणारे भारतीय नागरिक त्या देशाचे निवासी असतात. त्यांना आपण अनिवासी भारतीय (NRI) म्हणतो.<br>**महत्वाचे मुद्दे:** १. निवासींमध्ये व्यक्ती तसेच संस्थांचा समावेश होतो.<br>२. देशाच्या निवासींमध्ये भारताचे नागरिक तसेच परकीय (एक वर्षापेक्षा अधिक वास्तव्य असलेले) यांचा समावेश होतो. |

# 3 आर्थिक वृद्धी, आर्थिक विकास व समावेशी वृद्धी

| | |
|---|---|
| **आर्थिक वृद्धी** = वस्तू व सेवांच्या उत्पादनाचा स्तर वाढणे. | **आर्थिक विकास** = आर्थिक वृद्धी + संरचनात्मक बदल *किंवा*<br>**आर्थिक विकास** = आर्थिक वृद्धी + सामाजिक-आर्थिक कल्याण |

| | आर्थिक वृद्धी (Economic Growth) | आर्थिक विकास (Economic Development) |
|---|---|---|
| **अर्थ:** | देशातील वस्तू व सेवांच्या वास्तव उत्पादनातील वाढ होय. | आर्थिक वृद्धीबरोबरच देशाच्या सामाजिक-आर्थिक संरचनेमध्ये सुधारणात्मक बदल होय, ज्यांमध्ये संस्थात्मक व तांत्रिक बदलांचा समावेश होतो. |
| **घटक** | जी.डी.पी.च्या एक किंवा अधिक घटकांमध्ये होणाऱ्या क्रमशः वाढीशी संबंधित असतेः उपभोग, सरकारी खर्च, गुंतवूणक, निव्वळ निर्यात इत्यादी. | मानवी भांडवलातील वाढ, विषमतेमध्ये घट आणि लोकांच्या जीवनाची गुणवत्ता उंचावणाऱ्या संरचनात्मक बदलांशी संबंधित असते. |
| **मापन** | वास्तव जी.डी.पी. किंवा दरडोई उत्पन्न यांसारख्या संख्यात्मक घटकांच्या साहाय्याने मोजली जाते. | HDI, IHDI, GDI, GII, MPI यांसारख्या निर्देशांकांचा वापर केला जातो, ज्यांमध्ये प्रामुख्याने विकास दर्शविणाऱ्या महत्वाच्या निर्देशकांचा वापर केला जातो. |
| **परिणाम** | अर्थव्यवस्थेमध्ये संख्यात्मक बदल घडवून आणते. | अर्थव्यवस्थेमध्ये गुणात्मक बदल घडवून आणतो. |
| **महत्व** | राष्ट्रीय आणि दरडोई उत्पन्नातील वाढ दर्शविते. त्यातून देशातील वस्तू व सेवांच्या उत्पादनाचा स्तर व त्यात होत असलेली वाढ दिसून येते. | देशातील लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेमध्ये होत असलेली प्रगती दर्शविते. |

## समावेशी वृद्धीची संकल्पना

| | |
|---|---|
| **अर्थ** | वृद्धी प्रक्रियेत सर्वांना सामावून घेणाऱ्या वृद्धीला 'समावेशी वृद्धी' असे म्हटले जाते. |
| **प्रथम वापर** | सरकारी विकासाचा डावपेच म्हणून सर्वप्रथम 11 व्या योजनेच्या 'दृष्टिकोन पत्रा' त मांडण्यात आली. |
| **पूर्वी** | भारताच्या नियोजन प्रक्रियेमध्ये आधीपासूनच 'न्यायासह वृद्धी' (Growth with justice) किंवा 'समन्यायासह वृद्धी' (Growth with equity) या संकल्पना होत्याच. |
| **न्यायासह वृद्धी** | वितरणात्मक न्यायावर भर → सरकारी हस्तक्षेपाद्वारे उत्पन्नाचे वितरण अधिकाधिक समान करण्याचा प्रयत्नाचा समावेश → त्यासाठी उत्पादन व वितरण प्रक्रियेत सरकारची मोठी भूमिका प्रस्थापित करण्यावर भर → मात्र 1991 च्या आर्थिक सुधारणांपासून सरकारची भूमिका कमी झाल्याने समावेश वृद्धीची संकल्पना पुढे आली. |
| **११ व्या योजनेचा भर** | 'वेगवान आणि अधिक समावेशी वृद्धीच्या दिशेने' (Towards Faster and More Inclusive Growth) |
| **१२ व्या योजनेचा भर** | 'वेगवान, शाश्वत आणि अधिक समावेशी वृद्धी' (Faster, Sustainable and More Inclusive Growth) |

# 4 मानव विकास

| | |
|---|---|
| **संयुक्त राष्ट्राने केलेली व्याख्या** | **'लोकांच्या निवडींच्या विस्ताराची प्रक्रिया'**<br>**तीन अत्यावश्यक निवडी:** १. दीर्घ व आरोग्यवान जीवन जगणे, २. अधिक चांगले ज्ञान संपादन करणे आणि ३. चांगल्या जीवनमानासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध असणे.<br>**इतर निवडी:** राजकीय स्वातंत्र्य, मानवी हक्कांची हमी आणि स्वावलंबन व आत्मप्रतिष्ठेचे विविध घटक इ. |
| **मानवी विकासासाठी अटी** | १. विकास लोककेंद्रीत बनेल.<br>२. विकास हा सहभागयुक्त असावा,<br>३. विकासात संधी उपलब्ध असाव्या – लोकांना आपल्या क्षमतांमध्ये (आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षणविषयक) सुधारणा करण्यासाठी गुंतवणुकीच्या संधी.<br>४. लोकांना आपल्या क्षमता वापरण्याच्याही संधी उपलब्ध असाव्या – त्यासाठी त्यांना सामुदायिक निर्णयांमध्ये पूर्ण सहभाग घेता यावा, तसेच मानवी, आर्थिक आणि राजकीय स्वातंत्र्याचा लाभ प्राप्त व्हावा. |
| **आर्थिक वृद्धी विरूद्ध मानव विकास:** | ■ आर्थिक वृद्धीमध्ये केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढीवर भर दिला जातो.<br>■ मानवी विकासात मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा (आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा राजकीय) समावेश केला जातो.<br>■ अशा रितीने, मानवी विकासाची संकल्पना ही मानवी प्रयत्नांचे अंतीम ध्येय असून लोकांना चांगल्या जीवनाचा आनंद घेण्यासाठी सक्षम बनविण्याशी संबंधित आहे. हे ध्येय केवळ उत्पन्न किंवा भौतिक सुस्थितीमध्ये सुधारणा करून साध्य होऊ शकत नाही.<br>**आर्थिक वृद्धी कशी नसावी:** ■ "jobless' (नोकऱ्या निर्माण न करणारी), ■ "ruthless' (दमनकारी व दारिद्र्य कमी न करणारी), ■ "voiceless' (सहभागात्मक नसणारी), ■ "rootless' (संस्कृतीमध्ये रोवलेली नसणारी) आणि ■ "furtherless' (पर्यावरणास्नेही नसलेली) |

## मानव विकास अहवाल (Human Development Report: HDR)

| | |
|---|---|
| **प्रकाशन** | 'संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम' (UNDP) मार्फत दरवर्षी प्रकाशित |
| **सुरुवात** | १९९० पासून |
| **समावेश** | सध्या त्यामध्ये विविध देशांच्या पुढील निर्देशांकांची गणना केली जाते: |

| | निर्देशांक | सुरुवात | बदल |
|---|---|---|---|
| 1. | मानव विकास निर्देशांक (Human Development Index: HDI) | १९९० | २०१० |
| 2. | असमानता-समायोजित मानव विकास निर्देशांक (Inequality-adjusted HDI: IHDI) | २०१० | - |
| 3. | जेंडर असमानता निर्देशांक (Gender Inequality Index: GII) | १९९५ | २०१० |
| 4. | बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (Multi-dimensional Poverty Index: MPI) | १९९७ | २०१० |
| 5. | जेंडर विकास निर्देशांक (Gender Development Index: GDI) | २०१४ | – |
| 6. | जेंडर सामाजिक नियमने निर्देशांक (Gender Social Norms Index: GSNI) | २०१९ | – |
| 7. | ग्रहीय दबाव-समायोजित मानव विकास निर्देशांक (Planetary Pressure-adjusted HDI: PHDI) | २०२० | - |

# 5 सहस्त्रक विकास ध्येये आणि शाश्वत विकास ध्येये

## सहस्त्रक विकास ध्येये (Millennium Development Goals: MDGs)

| | |
|---|---|
| स्विकार | सप्टेंबर २००० मध्ये भरलेल्या 'संयुक्त राष्ट्र सहस्त्रक परिषदे'मध्ये |
| उद्देश | जगातून गरिबी, भूक, रोग, निरक्षरता, पर्यावरणीय ऱ्हास आणि महिलांविरोधी भेदभाव हद्दपार करण्यासाठी कालबद्ध आणि मोजता येतील अशा लक्ष्यांचा एक संच म्हणून स्विकार |
| आराखडा | २००० मध्ये ८ ध्येये + १८ लक्ष्ये + ४८ निर्देशके<br>२००३ मध्ये ८ ध्येये + १८ लक्ष्ये + ५३ निर्देशके<br>२००८ मध्ये ८ ध्येये + २१ लक्ष्ये + ६० निर्देशके |
| कालावधी | १ जानेवारी, २००१ ते ३१ डिसेंबर, २०१५ |
| मुख्य उद्दिष्ट | दारिद्र्य निर्मूलन |
| लागू | विकसनशील देशांना लागू |
| ८ ध्येये | ध्येय १ – अती दारिद्र्य व भुकेचे निर्मूलन करणे<br>ध्येय २ – सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण साध्य करणे<br>ध्येय ३ – जेंडर समानेत प्रोत्साहन देणे व महिलांचे सबलीकरण करणे<br>ध्येय ४ – बाल मर्त्यतेचे प्रमाण कमी करणे<br>ध्येय ५ – माता आरोग्यात सुधारणा घडवून आणणे<br>ध्येय ६ – एचआयव्ही/एड्स, मलेरिया व इतर रोगांशी सामना करणे<br>ध्येय ७ – पर्यावरणीय शाश्वतता साध्य करणे<br>ध्येय ८ – विकासासाठी जागतिक भागीदारी |
| भारतासाठी | ८ ध्येये + १२ लक्ष्ये + ३५ निर्देशके |

साध्यता →

- भारताने १२ पैकी ६ लक्ष्ये पूर्ण करण्याचा दावा केला.
- यु.एन.डी.पी.च्या मते मात्र भारताने चारच लक्ष्ये साध्य केली :

१. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण निम्मे करणे, मात्र प्रगती असमान (लक्ष्य १)
२. शिक्षणातील जेंडर असमानता नष्ट करणे. (लक्ष्य ४)
३. एच.आय.व्ही./एड्सचा प्रसार थांबविणे. (लक्ष्य ५)
४. खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने माहिती व संचार तंत्रज्ञानाचे फायदे उपलब्ध करून देणे. (लक्ष्य १८)

## शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals: SDGs)

| | |
|---|---|
| उगम | 2012 साली भरलेल्या 'रिओ+20' या संयुक्त राष्ट्राच्या परिषदेच्या 'The Future We Want' या अहवालात MDGs च्या जागी SDGs चा स्विकार करण्याचे पहिल्यांदा ठरविण्यात आले. |
| स्विकार | सप्टेंबर, 2015 मध्ये संयुक्त राष्ट्र आमसभेच्या 'संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास शिखर परिषदे'च्या 'Transforming Our World: the 2030 Agenda for Sustainable Development' या अहवालात 17 SDGs चा स्विकार. |
| उद्देश | शाश्वत विकास |
| आराखडा | १७ ध्येये + १६९ लक्ष्ये |
| कालावधी | १ जानेवारी, २०१६ ते ३१ डिसेंबर, २०३० |
| लागू | जगातील सर्व राष्ट्रांना लागू |
| १७ ध्येये | 1. दारिद्र्य नष्ट करणे<br>2. भूक नष्ट करणे<br>3. चांगले आरोग्य व सुस्थिती<br>4. गुणवत्तेचे शिक्षण<br>5. लिंग समानता<br>6. स्वच्छ पेयजल व स्वच्छता<br>7. परवडण्याजोगी व स्वच्छ ऊर्जा<br>8. चांगली कार्यस्थिती आणि आर्थिक वाढ<br>9. उद्योग, नवाचार आणि पायाभूत संरचना<br>10. विषमता कमी करणे<br>11. शाश्वत शहरे व समुदाय<br>12. जबाबदार उपभोग व उत्पादन<br>13. हवामान कृती<br>14. पाण्याखालील जीवन<br>15. जमिनीवरील जीवन<br>16. शांतता, न्याय व मजबूत संस्था<br>17. लक्ष्यपूर्तीसाठी भागीदारी |

# 6 शाश्वत विकास

## शाश्वत विकास

| | |
|---|---|
| इतर संज्ञा | चिरकालीन विकास, टिकाऊ विकास, निरंतर विकास इ. |
| अर्थ | ■ वर्तमानातील विकास भविष्यातही टिकून राहिल असा विकास<br>■ भविष्यकालिन विकासाची शाश्वती वर्तमानात देणारा विकास<br>■ एखाद्या समाजाची नैसर्गिक, पर्यावरणीय, आर्थिक तसेच सांस्कृतिक अवस्था टिकवून ठेवणारा विकास<br>■ ''शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांची स्वतःच्या गरजा भागविण्याची क्षमता धोक्यात न आणता वर्तमानातील गरजा भागवू शकतो.'' (ब्रन्डलँड आयोग, १९८७) |

## शाश्वत विकासाच्या संकल्पनेचा उगम

| | |
|---|---|
| १९६२ | रॅचेल कार्लसन यांनी 'The Silent Spring' (1962) या आपल्या पुस्तकात DDT या किटकनाशकामुळे होणाऱ्या वन्यजीवाच्या हानीकडे जगाचे लक्ष वेधून घेतले. |
| १९६८ | पॉल ईहर्लिच यांनी आपल्या 'Population Bomb' (1968) या पुस्तकात मानवी लोकसंख्या, संसाधन वापर आणि पर्यावरण यांतील संबंधाची चर्चा केली. |
| १९७१ | 'OECD' या संघटनेने 'Polluter Pays Principle' या तत्वाचा स्विकार केला, म्हणजेच प्रदूषण करणाऱ्यानेच त्याची किंमत मोजावी असा या तत्वाचा अर्थ होतो. |
| १९७२ | अमेरिकेतील MIT या संस्थेतील काही तरूण वैज्ञानिकांनी (Club of Rome) 'Limits to Growth' (1972) हा अहवाल प्रकाशित केला. या अहवालात आर्थिक वृद्धी प्रक्रियेवर मर्यादा न आणल्यास होणाऱ्या भविष्यकालिन संभाव्य परिणामांची चर्चा करण्यात आली. |
| १९७२ | ■ संयुक्त राष्ट्राने स्टॉकहोम येथे 'UN Conference on Human Environment' (UNCHE) ही परिषद भरविली.<br>■ या परिषदेत पहिल्यांदा पर्यावरण हा एक विकासाचा निर्णायक मुद्दा असल्याचे मानण्यात आले.<br>■ परिषदेमध्ये चर्चा मुख्यतः 'Limits to Growth' अहवालावर, तसेच आर्थिक विकासावर करण्यात आली.<br>■ परिषदेचे घोषवाक्य 'Only One Earth' हे होते.<br>■ या परिषदेच्या परिणामस्वरूप 'United Nations Environment Programme' (UNEP) ची स्थापना करण्यात आली. UNEP चे पहिले संचालक मॉरिस स्ट्राँग यांनी 'Eco Development' या संज्ञा वापरली. |
| १९८० | ■ IUCN चे दोन तज्ज्ञ इवा बेलफोर आणि वेक जॅक्सन यांनी 1980 मध्ये 'जागतिक संवर्धन डावपेच' (World Conservation Strategy) हा अहवाल प्रकाशित केला.<br>■ त्यामध्ये सर्वप्रथम 'शाश्वत विकास' (Sustianable Development) हा शब्दप्रयोग करण्यात आला. |
| १९८७ | **१९८३:** ■ संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने 'जागतिक पर्यावरण व विकास आयोग' (WCED) स्थापन केला. ■ अध्यक्षा नॉर्वेच्या पंतप्रधान 'श्रीमती ग्रो हर्लेन ब्रन्डलँड'. म्हणून आयोगाला '**ब्रन्डलँड आयोग**' असे म्हणतात.<br>**१९८७:** आयोगाचा अहवाल 'Our Common Future' या नावाने सादर.<br>**व्याख्या:** अहवालात शाश्वत विकासाची पुढील व्याख्या देण्यात आली. ''शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो भविष्यकालीन पिढ्यांची स्वतःच्या गरजा भागविण्याची क्षमता धोक्यात न आणता वर्तमानातील गरजा भागवू शकतो.'' |

# 7 आर्थिक नियोजन

## आर्थिक नियोजन

| | |
|---|---|
| **अर्थ** | देशाच्या अर्थव्यवस्थेचे सरकारी नियोजन होय. |
| **व्याख्या** | ‘पूर्वनिर्धारित सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी देशातील संसाधनांना संघटित करून त्यांचा महत्तम लाभकारक उपयोग करण्याच्या दृष्टीने अवलंबिण्यात येणारी पद्धती म्हणजे नियोजन होय.’ |
| **भारतात** | आर्थिक नियोजन १ एप्रिल, १९५१ ते ३१ मार्च, २०१७ दरम्यान होते. |
| **त्यादरम्यान** | १२ पंचवार्षिक योजना व ७ वार्षिक योजना राबविण्यात आल्या.<br>**७ वार्षिक योजना**: ▸ १९६६ ते १९६९ दरम्यान ३ वार्षिक योजना ▸ १९७८ ते १९८० दरम्यान २ वार्षिक योजना ▸ १९९० ते १९९२ दरम्यान २ वार्षिक योजना |
| **दीर्घकालीन उद्दिष्टे** | १.आर्थिक वृद्धी; २.स्वावलंबन; ३.सामाजिक न्याय; ४.आधुनिकीकरण; ५.दारिद्र्य निर्मूलन; ६.रोजगार निर्मिती |

## नियोजनाचे प्रकार

- १. आदेशाद्वारे नियोजन → २. प्रलोभनाद्वारे नियोजन → ३. सूचक नियोजन
- १. वित्तीय नियोजन → २. भौतिक नियोजन
- १. केंद्रीकृत नियोजन → २. विकेंद्रीकृत नियोजन

| | |
|---|---|
| **आदेशाद्वारे नियोजन** | ■ समाजवादी अर्थव्यवस्थांमध्ये असते, मुक्त बाजारव्यवस्थेचा अभाव असलेल्या<br>■ योजनेची उद्दिष्टे आदेशाद्वारे पूर्ण केली जातात.<br>■ भारतात ७ व्या योजनेपर्यंत आदेशात्मक नियोजन होते. |
| **प्रलोभनाद्वारे नियोजन** | ■ लोकशाही देशांमध्ये असे नियोजन आढळते.<br>■ योजनेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध प्रलोभने दिली जातात. उदा. अनुदाने<br>■ भारताने या पद्धतीचाही वापर आधीपासूनच केला आहे. |
| **सूचक नियोजन** | ■ खाजगी क्षेत्राचे कडकपणे नियंत्रण न करता त्यांना सूचना केल्या जातात व सवलती दिल्या जातात. उदा. फ्रान्स<br>■ भारतात ७ व्या योजनेत विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रासाठी, तर ८ व्या योजनेपासून पूर्णपणे सूचक नियोजनाचा प्रारंभ |
| **वित्तीय नियोजन** | संसाधनांचे वितरण पैशाच्या स्वरुपात केले जाते. |
| **भौतिक नियोजन** | संसाधनांची तरतूद भौतिक आदानांच्या स्वरुपात (कामगार, कच्चा माल, यंत्रसामुग्री इ.) केली जाते. |
| **केंद्रीकृत नियोजन** | नियोजनाची पूर्ण प्रक्रिया एकाच केंद्रीय नियोजन यंत्रणेकडून पार पाडली जाते. |
| **विकेंद्रीकृत नियोजन** | नियोजन प्रक्रियेत केंद्रीय नियोजन यंत्रणेकडून राज्ये व जिल्ह्यांना सुद्धा सहभागी करून घेतले जाते. |


# 8 दारिद्र्य

| | |
|---|---|
| अर्थ | ■ जीवनाच्या किमान मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य इ.) भागविता न येण्याची परिस्थिती.<br>जन दारिद्र्य: समाजाचा एक मोठा गट जिवनाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अपयशी ठरण्याची स्थिती. |
| प्रकार | **सापेक्ष दारिद्र्य**: देशातील उच्चतम ५ किंवा १० टक्के लोकसंख्येची संपत्ती/उत्पन्न/उपभोगाची तुलना न्यूनतम ५ किंवा १० टक्के लोकसंख्येशी करणे.<br>**निरपेक्ष दारिद्र्य**: देशातील न्यूनतम उपभोग स्तर (दारिद्र्य रेषा) निर्धारित करून त्यापेक्षा कमी उपभोग करणाऱ्या लोकसंख्येला गरीब समजणे. |
| दारिद्र्याचे दृष्टचक्र | **संकल्पना**: **रॅगनर नर्कसे** यांनी 1953 मध्ये मांडली.<br>**अर्थ**: दारिद्र्याचे दृष्टचक्र म्हणजे अशा घटकांचा/घटनांचा संच ज्यामुळे एकदा स्थापित झालेली दारिद्र्याची स्थिती, बाह्य हस्तक्षेप केला नाही तर, तशीच कायम राहते.<br>**चक्र**: निम्न उत्पन्न–आरोग्य व शिक्षण सुविधांप्रती अल्प प्रवेश–हलक्या प्रतीच्या मानवी भांडवलाची निर्मिती–निम्न उत्पादकता–जीवनमानाचा घसरता दर्जा–पर्याप्त रोजगाराच्या संधींची कमतरता व निम्न मजुरी–निम्न उत्पन्न. |
| सांस्कृतिक दारिद्र्य | **संकल्पना**: **ऑस्कर लेवीस** यांनी 1960 च्या दशकात मांडली.<br>**अर्थ**: दारिद्र्य हे लोकांच्या सांस्कृतिक प्रथा-परंपरा व मूल्यांचा परिणाम असते.<br>**उदा.**: गरीब कुटुंबात जन्माला आलेली व वाढणारी मुलं काही विशिष्ट सांस्कृतिक मूल्ये ग्रहण करतात, जी त्यांच्या जीवनविषयक निवडी व संधींना आकार देत असतात.<br>**समावेश**: अशा सांस्कृतिक मूल्यांमध्ये दैववादी प्रवृत्ती, औपचारिक शिक्षणाप्रती अनास्था, प्रगतीची कमी अपेक्षा, कुटुंबाचा आकार अशा अनेक बाबींचा समावेश. |


## भारतातील दारिद्र्याचे मोजमापः दारिद्र्य रेषा

| | |
|---|---|
| दारिद्र्य रेषेचा निकष | **मासिक प्रतिव्यक्ती उपभोग खर्च** (Monthly Per capita Consumption Expenditure: MPCE) |
| दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती/कुटुंबे (BPL) | या न्यून स्तरापेक्षाही कमी उपभोग खर्च करणारे |
| दारिद्र्य रेषेवरील व्यक्ती/कुटुंब (APL) | त्यापेक्षा अधिक खर्च करणारे व्यक्ती/कुटुंबे |
| दारिद्र्य प्रमाण | दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण, 'Head-Count Ratio' असेही म्हणतात. |
| आकडेवारीचा स्त्रोत | NSSO च्या पंचवार्षिक 'घरगुती उपभोग खर्च सर्वेक्षणा'च्या आकडेवारीचा वापर |
| रिकॉल पिरिसड्स | NSSO ने अशी आकडेवारीच्या संकलनांसाठी तीन 'रिकॉल पिरियड्स'चा वापर केला आहे.<br>**युनिफॉर्म रिकॉल पिरियड (URP)**: ■ 30 दिवसांचा रिकॉल काळ → सर्व उपभोग्य वस्तुंसाठी ■ या पद्धतीचा वापर → 1993-94 पर्यंत करण्यात आला. |

## धनंजयराव गाडगीळ कार्यगट, १९६२




### राष्ट्रीय किमान उपभोग खर्च




- केवळ अन्नावरील खर्च गृहीत धरण्यात आला → आरोग्य व शिक्षण सेवा गरीब व्यक्तींना मोफत मिळतात या कारणामुळे
- ही दारिद्र्य रेषा मात्र अधिकृत नव्हती, मात्र तिचा वापर १९६० व १९७० च्या दशकात व्यापकतेने करण्यात आला.

## वाय. के. अलग कार्य गट, १९७९




- **स्थापना :** जुलै १९७७,
- **अहवाल :** जानेवारी १९७९
- कॅलरी उपभोगाच्या संकल्पनेचा वापर **(प्रथम शिफारस, – व्हि. एम. दांडेकर व निळकंठ रथ यांच्या 'भारतातील दारिद्र्य' (१९७१) या अहवालात)**

कॅलरी → ग्रामीण २४०० कॅ. / शहरी २१०० कॅ.

MPCE → ४९.०९ रु. / ५६.६४ रु.

- स्वतंत्र शहरी व ग्रामीण दारिद्र्य रेषा संचांचा (PLB) वापर, मात्र राज्यांसाठी स्वतंत्र दारिद्र्य रेषांचे मापन केले नाही.

## लकडावाला तज्ज्ञ गट, १९९३



- **स्थापना :** सप्टेंबर, १९८९
- **अहवाल :** जुलै १९९३
- **स्विकार :** मार्च १९९७

१) दारिद्र्य रेषेची पुनर्व्याख्या केली नाही → अलग MPCE चाच स्विकार केला.

२) मात्र राष्ट्रीय दारिद्र्य रेषेचे विभक्तीकरण करुन राज्याच्या स्वतंत्र दारिद्र्य रेषा तयार केल्या.
- **राष्ट्रीय शहरी दारिद्र्य रेषेवरून** → राज्य शहरी दारिद्र्य रेषा
- **राष्ट्रीय ग्रामीण दारिद्र्य रेषेवरून** → राज्य ग्रामीण दारिद्र्य रेषा

३) आंतरराज्यीय किंमत फरकाचे मोजमाप 'फिशर्स इंडेक्स' द्वारे करण्यात आले.

४) १९७३-७४ च्या आधारभूत राज्य दारिद्र्य रेषा पुढे अद्ययावत करण्यासाठी GDP अवस्फितिक ऐवजी पुढील निर्देशांक वापरण्यात आले
- **ग्रामीण भागासाठी :** CPI - AL
- **शहरी भागासाठी :** CPI - IW

५) दारिद्र्य रेषेच्या मोजमापासाठी NSS च्या URP चा वापर करण्यात आला.

| | |
|---|---|
| **शासनाद्वारे वापर** | मार्च १९९७ ते जानेवारी २०११ पर्यंत अधिकृत दारिद्र्य रेषा लकडावाला पध्दतीवर आधारलेली होती. |
| **या पध्दतीच्या आधारे नियोजन मंडळाने :** | ■ १९७३-७४, १९७७-७८, १९८३, १९८७-८८, १९९३-९४ : URP आधारावर<br>■ १९९९-००, २००४-०५ : MRP आधारावर |

# 9 रोजगार व बेरोजगारी

## मूलभूत संकल्पना

**कामगार म्हणजे काय?**

- कोणत्याही आर्थिक क्रियांमध्ये गुंतलेल्या व राष्ट्रीय उत्पादात भर घालणाऱ्या सर्व व्यक्तींना कामगार असे म्हणतात.

**कामगारांचे वर्गीकरण**

| | |
|---|---|
| १. नियमित पगारदार/मजुरी कर्मचारी | इतरांच्या कृषि किंवा गैर-कृषि उपक्रमांमध्ये काम करणारे आणि नियमित पगार किंवा मजुरी मिळविणारे व्यक्ती. |
| २.किरकोळ मजुरी कामगार | इतरांच्या कृषि किंवा गैर-कृषि उपक्रमांमध्ये काम करणारे, मात्र मालकाशी करारानुसार दैनिक/साप्ताहिक इ. मजुरी मिळविणारे. |
| ३. स्वयं-रोजगारी | स्वत:चे कृषि किंवा गैर-कृषि उपक्रम चालविणारे किंवा स्वतंत्र व्यवसाय/व्यापारात एकटे किंवा भागीदारीत गुंतलेले व्यक्ती. त्यांचे अजून तीन गट केले जातात:- |

| | |
|---|---|
| १. स्वाधीन कामगार | भाडोत्री कामगाराविना आपला उपक्रम/व्यवसाय चालविणारे |
| २. रोजगार देणारे | भाडोत्री कामगारांच्या साहाय्याने आपला उपक्रम/व्यवसाय चालविणारे |
| ३. मदतनीस | स्वत:च्या घरगुती उपक्रमांमध्ये पूर्ण/अंशकालीन काम करणारे, मात्र कोणताही नियमित मोबदला न मिळणारे व्यक्ती. |

**संघटित व असंघटित क्षेत्र म्हणजे काय?**

| | |
|---|---|
| संघटित क्षेत्रातील कामगार | |
| असंघटित क्षेत्रातील कामगार | |

## बेरोजगारीचे प्रकार

| ग्रामीण भागात | शहरी भागात | विकसनशील देशांमध्ये | विकसित देशांमध्ये |
|---|---|---|---|
| १. खुली बेरोजगारी<br>२. हंगामी बेरोजगारी<br>३. अदृश्य/प्रच्छन्न | १. खुली बेरोजगारी<br>२. सुशिक्षित बेरोजगारी<br>३. कमी प्रतीची | १. घर्षणात्मक<br>२. संरचनात्मक<br>३. तांत्रिक<br>४. दीर्घकालिक/जुनाट<br>५. प्रासंगिक | १.चक्रीय |

**खुली बेरोजगारी**

- काम करण्याची इच्छा व क्षमता असूनही नियमित उत्पन्न देणारा रोजगार प्राप्त होत नसेल तर.

  उदा. ग्रामीण भागातील स्वत:च्या मालकीची शेतजमीन नसलेले अकुशल व अर्धकुशल कामगार, रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरी भागात आलेले बेरोजगार इ.

**हंगामी बेरोजगारी**

- शेतीचा नांगरणीपासून कापणीपर्यंतचा कालावधी सोडून वर्षाच्या इतर काळात भासणारी बेरोजगारी हे हंगामी बेरोजगारीचे उत्तम उदाहरण आहे. अशा प्रकारची बेरोजगारी पर्यटन क्षेत्र, वूलन कापडाचे कारखाने, आईस्क्रिमचे कारखाने इत्यादींमध्येही निर्माण होऊ शकते.

# 10 दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मिती योजना


## १) अवर्षण - प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP)

| | |
|---|---|
| सुरूवात | १९७३-७४ |
| मुख्य उदिष्ट्ये | जमीन, पाणी आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा संतुलित विकास घडवून आणून या देशातील पर्यावरणाचा समतोल पुनर्स्थापित करणे. |
| वित्त पुरवठा | या योजनतेसाठी वित्त पुरवठ्याची व्यवस्था केंद्र आणि राज्य सरकारामध्ये ५०:५० प्रमाणात केली जाते. |
| एकात्मक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम (IWMP) | प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP) + एकात्मिक पडीक भूमी विकास कार्यक्रम (IWMP) + वाळवंट विकास कार्यक्रम (DDP) |

## २) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम

| | |
|---|---|
| सुरूवात | २ ऑक्टोबर १९८० १ एप्रिल १९९९ |
| उद्देश | ■ दारिद्र्य रेषा पार करण्यासाठी ग्रामीण गरीब कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे. हा उद्देश साध्य करण्यासाठी लक्ष्य गटामध्ये स्वयंरोजगाराचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांना उत्पादनक्षम भांडवलाचा पुरवठा करण्याची तरतूद त्यामध्ये होती.<br>■ या योजनेसाठी आवश्यक वित्तपुरवठा केंद्र व राज्य सरकारे ५०:५० या प्रमाणात करीत असत. |

## 3) जवाहर रोजगार योजना (JRY)



# 11 लोकसंख्या

## लोकसंख्याशास्त्र

### जागतिक लोकसंख्येच्या वाढीचे टप्पे

| | | |
|---|---|---|
| 1. | 1804 | 1 अब्ज: |
| 2. | 1927 | 2 अब्ज: |
| 3. | 1960 | 3 अब्ज: |
| 4 | 1974 | .4 अब्ज: |
| 5. | 11 जुलै, 1987 | 5 अब्ज: |
| 6. | 12 ऑक्टोबर, 1999 | 6 अब्ज: |
| 7. | 31 ऑक्टोबर, 2011 | 7 अब्ज: |
| 8. | 15 नोव्हेंबर, 2022 | 8 अब्ज: |



**११ जुलै**

**'जागतिक लोकसंख्या दिन'**

(11 जुलै, 1987 रोजी जागतिक लोकसंख्या पाच अब्ज झाल्याचे मानले जाते. 'संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमा'द्वारे (UNDP) द्वारे 11 जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो.)

### सर्वाधिक लोकसंख्येचे प्रथम १० देश

- 'जागतिक लोकसंख्या स्थिती, 2023' (State of World Population, 2023)

| | देश | लोकसंख्या (दशलक्ष) | | देश | लोकसंख्या (दशलक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १. | भारत | 1,428.6 | 6. | नायजेरिया | 223.8 |
| २. | चीन | 1,425.7 | 7. | ब्राझिल | 216.4 |
| ३. | यु.एस.ए. | 340.0 | 8. | बांग्लादेश | 173.0 |
| ४. | इंडोनेशिया | 277.5 | 9. | रशिया | 144.4 |
| ५. | पाकिस्तान | 240.5 | 10. | मेक्सिको | 128.5 |

- 11 एप्रिल, 2023 रोजी संयुक्त राष्ट्राने भारताची लोकसंख्या (142.86 कोटी) चीनपेक्षा (142.57 कोटी) अधिक झाल्याचे घोषित केले.

### लोकसंख्येच्या अवस्था

| अवस्था | जन्मदर | मृत्युदर |
|---|---|---|
| उच्च स्थिर | जास्त | जास्त |
| प्रारंभीची प्रसरणशील | जास्त | कमी |
| उशिराची प्रसरणशील | कमी | कमी |
| निम्न स्थिर | स्थिर | स्थिर |

### लोकसंख्येच्या वाढीचा दर

- लोकसंख्येचा दर स्थालांतर, जन्म दर आणि मृत्यू दर या तीन घटकांच्या आधारे ठरतो.
- परदेशातून भारतात होणाऱ्या स्थलांतराला 'आगमन स्थलांतर' असे संबाधले जाते.
- भारतातून परदेशात होणाऱ्या स्थलांतराला 'परागमन स्थलांतर' असे संबाधले जाते.
- 'आगमन स्थलांतर' आणि 'परागमन स्थलांतर' दोन्ही स्थलांतरांमधील फरकाला 'निव्वळ स्थलांतर' असे म्हणतात.
- जन्म दर म्हणजे एका वर्षात १००० लोकसंख्येमागे जन्माला आलेल्या बालकांची संख्या होय.
- मृत्यू दर म्हणजे एका वर्षात १००० लोकसंख्येमागे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची संख्या होय.
- त्यामुळे एका वर्षाच्या जन्मदर व मृत्यू दरातील फरकाला 'निव्वळ लोकसंख्या वाढीचा दर' असे संबोधले जाते.
- १९८१ पासून लोकसंख्येचा दशकीय वाढीचा दर कमी होत आहे.

# 12 समावेशन

- देशाच्या आर्थिक वृद्धीच्या फायद्यांपासून वंचित राहिलेल्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे **'समावेशन'** होय.
- अशा समावेशनाची **प्रमुख तीन स्वरूपे** आहेत : आर्थिक समावेशन, वित्तीय समावेशन आणि सामाजिक समावेशन.

| | |
|---|---|
| **आर्थिक समावेशन** | ■ राष्ट्राच्या उत्पन्न वाढीचे फायदे सर्वांना मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना आर्थिक समावेशन असे म्हणता येईल.<br>■ आर्थिक समावेशकता समस्या हाताळण्यासाठी भारत सरकारने डॉ. सी रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली 'आर्थिक समावेशक समिती' स्थापन करण्यात आली होती.<br>■ बऱ्याचदा आर्थिक वृद्धी होत असली तरी रोजगाराच्या पुरेशा संधी निर्माण न झाल्याने 'रोजगारविरहीत वृद्धी' अशी स्थिती निर्माण होते.<br>■ ११ व्या योजनेचा भर 'वेगवान आणि अधिक समावेशी वृद्धीच्या दिशेने' यावर होता, तर १२ व्या योजनेचा भर 'वेगवान, शाश्वत आणि अधिक समावेशी वृद्धी' यावर होते. |
| **वित्तीय समावेशन** | ■ वित्तीय समावेशन म्हणजे देशातील मोठ्या वंचित व अल्प उत्पन्न गटातील जनतेला कमी खर्चात बँकींग सेवा उपलब्ध करून देणे होय.<br>■ बँकींग सेवा एक प्रमुख 'सार्वजनिक वस्तू' आहे.<br>■ त्यामुळे बँकींग व पेमेंट सेवा देशातील सर्व जनतेला भेदभावाविना उपलब्ध करून देणे, हे सार्वजनिक धोरणाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. |

## प्रधानमंत्री जन-धन योजना

| | |
|---|---|
| **योजनेची घोषणा** | १५ ऑगस्ट २०१४ (पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी) |
| **योजनेची सुरुवात** | २८ ऑगस्ट २०१४ |
| **योजना** | ■ ही योजना एक **'राष्ट्रीय वित्तीय समावेशन अभियान'** आहे. |
| **उद्दिष्ट** | ■ या योजनेचे दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींना मूलभूत बचत खाते, गरजेवर आधारित कर्ज उपलब्धता, धनप्रेषण सुविधा, विमा व पेन्शन इत्यादी सुविधा उपलब्ध करून देणे हे आहे.<br>■ प्रधानमंत्री जनधोन योजना **'वित्तीय समावेशन, वित्तीय साक्षरता, विम्याचे कवच'** यासाठी सुरु केली गेली. |
| **६ आधार** | १) बँक सेवांची सार्वत्रिक उपलब्धता<br>२) सर्व कुटुंबांना मूलभूत बँक खाते<br>३) सुविधा व रूपे डेबिट कार्ड उपलब्ध करून देणे.<br>४) पत हमी निधी ची स्थापनाः<br>५) स्वावलंबन सारख्या असंघटित क्षेत्रासाठी पेन्शन योजना<br>६) सूक्ष्म विमा |
| **प्रमुख वैशिष्ट्ये** | ■ जनधन खाते = मूलभूत बचत बँक ठेव खाते<br>■ कोणत्याही बँकेच्या शाखेत काढता येते.<br>प्रत्येक खातेदाराला:<br>■ रूपे (RuPay) डेबिट कार्ड दिले जाते.<br>■ विनाशुल्क एक लाख रूपयांपर्यंत अपघात विम्याचे कव्हर<br>■ १०,००० रूपयांपर्यंतची ओव्हरड्राफ्ट सुविधा (एका कुटुंबातील एका १८ ते ६५ वयाच्या खातेदाराला) (२,००० रु.पर्यंतचा ओव्हरड्राफ्ट विनाअट) |

# 13 भारतातील आर्थिक सुधारणा

| | |
|---|---|
| **सुरुवात** | ■ २१ जून, १९९१ रोजी पी.व्ही.नरसिंहराव यांचे सरकार<br>■ अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी अनेक धोरणात्मक निर्णय.<br>■ त्यांना एकत्रितरित्या 'आर्थिक सुधारणा' असे संबोधले गेले. |

| | |
|---|---|
| **आर्थिक सुधारणा हाती घेण्याची कारणे/१९९१ चे संकट**<br>■ १९९१ चे संकट एकदम उद्भवलेले संकट नव्हते.<br>■ १९८० च्या दशकातील आर्थिक गैर-व्यवस्थापनाचाच तो परिपाक होता. | **त्यात भर पडली:**<br>१९९० चे आखाती युद्ध, राजकीय अस्थैर्य |

## तीन प्रमुख आर्थिक समस्या

**१) राजकोषीय संकट**

| | |
|---|---|
| **केंद्र शासनाची राजकोषीय तूट** | १९८०-८१ → ६.३ टक्के (जीडीपीच्या) |
| | १९८९-९० → ८.२ टक्के (जीडीपीच्या) |

■ ही तूट भरून काढण्यासाठी प्रचंड अंतर्गत व परकीय कर्जे घेतली होती.

उदा.

| | |
|---|---|
| **अंतर्गत कर्जाचे प्रमाण** | १९८०-८१ → ३५ टक्के (जीडीपीच्या) |
| | १९९०-९१ → ५३ टक्के (जीडीपीच्या) |

**२) अनियंत्रित व्यवहारतोलाचा प्रश्न**

■ चालू खात्यावरील तूट १९८० च्या दशकात दुपटीने वाढली.
■ तूट भरून काढण्यासाठी सरकारने भरमसाठ परकीय कर्जे घेतली.
■ परकीय चलनसाठा केवळ ५.८ अब्ज डॉलर्सस केवळ २ आठवड्यांच्या आयातीसाठी पुरेसा.

**३) चलनवाढीचा उच्च दर**

सलग ३ वर्षे मान्सून अनुकूल असतांनाही घाऊक किंमतींचा निर्देशांक (WPI) :

| |
|---|
| ■ १९८५-८६ → ४.५ टक्के |
| ■ १९९०-९१ → १० टक्क्यांपेक्षा अधिक |

## संरचनात्मक दोष/मर्यादा

**अर्थव्यवस्थेत अनेक दीर्घकालीन संरचनात्मक दोष निर्माण झालेले होते वृद्धी दर कमी,**

**उदाहरणार्थ:**

१. कृषि क्षेत्र राष्ट्रीय उत्पन्न व श्रम लोकसंख्येत मोठा हिस्सा, मात्र अल्प वाढीचा दर, तसेच गुंतवणुकीचा व भांडवल निर्मितीचा अल्प दर.
२. आयातीवर आधारीत औद्योगिकीकरणाचे धोरण निर्यात वाढीपेक्षा आयात वाढीचा सातत्याने अधिक दर.
३. लायसेन्स-परमीट-इन्स्पेक्शन राज (License-Permit Inspection Raj ) व्यवस्था
४. परकीय तसेच देशांतर्गत व्यापारावरील अनेकवीध बंधने.
५. वित्तीय व्यवस्थेवरील बंधने.
६. सार्वजनिक क्षेत्र आरक्षण, लघु उद्योग क्षेत्र आरक्षण.
७. बँकींग कायदे, कामगार कायदे इत्यादींमुळे निर्माण झालेल्या मर्यादा.

# 14 भारतीय वित्तीय व्यवस्था

**अर्थ**

व्यापक दृष्टीने, वित्त म्हणजे कर्जाने दिला-घेतला जाणारा पैसा होय. विविध कारणांसाठी वापरण्यात येणाऱ्या वित्ताच्या देवाणघेवाणीतून निर्माण होणाऱ्या व्यवस्थेस 'वित्तीय व्यवस्था' (Financial System) असे म्हणतात.

**भारतीय वित्तीय व्यवस्थेचे भाग**


| | | | |
|---|---|---|---|
| 1. वित्तीय बाजार | 2. वित्तीय संस्था | 3. वित्तीय सेवा | 4. वित्तीय साधने |

- वित्तीय बाजारात काम करणाऱ्या विविध वित्तीय संस्था विविध प्रकारच्या वित्तीय सेवा वेगवेगळ्या वित्तीय पतसाधनांच्या साहाय्याने उपलब्ध करून देतात.

**वित्तीय बाजार**

- वित्तीय बाजार म्हणजे वित्तीय मालमत्तांच्या निर्मितीचा व विनिमयाचा बाजार होय.
- वित्तीय मालमत्ता म्हणजे अशी वित्तीय साधने ज्यांच्या साहाय्याने निधीची देवाणघेवाण पार पडते. त्यांमध्ये सरकारी रोखे, शेअर्स, डिबेंचर्स, बाँड्स अशा साधनांचा समावेश होतो.

**वित्तीय बाजारांचे वर्गीकरण**




**भारतीय नाणे बाजार (Indian Money Market)**

- अल्पकालीन निधींची देवाणघेवाण होत
- कर्ज व्यवहार १ वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी होतात. (कृषिसाठी १५ ते १८ महिने).
- असंघटित नाणे बाजारात सावकार, सराफी पेढीवाले इत्यादींचा समावेश होतो.
- संघटित क्षेत्रात व्यापारी बँकांचा समावेश होतो.


**भारतीय भांडवल बाजार (Indian Capital Market)**

- मध्यम तसेच दीर्घकालीन निधींची देवाण-घेवाण होते
- १ वर्षापेक्षा अधिक कालावधीचे कर्ज व्यवहार होतात.
- साधारणत: ५ वर्षांपर्यंतच्या कालावधीला मध्यमकालिन तर ५ वर्षांपेक्षा अधिक कालावधीला दीर्घकालिन समजले जाते.

**भारतीय भांडवल बाजारातील संस्था:**

१. व्यापारी बँका
२. विकास वित्तीय संस्था.
   उदा. IFCI, IDBI, ICICI, SFCs, SIDCs, इ.
३. विमा कंपन्या: LIC आणि GIC.
४. मर्चंट बँका
५. म्युचुअल फंडस्: UTI
६. पतदर्जा ठरविणाऱ्या संस्था CRISIL, CARE, ICRA
७. रोखे बाजार इ.

# 15 भारतीय व्यापारी बँक व्यवसाय




## भारतातील बँक व्यवसायाची उत्क्रांती

| | |
|---|---|
| १७७० | Bank of Hindustan - पहिली बँक, Alexander and CO, ने स्थापन केली, २० वर्षानंतर बंद पडली. |
| इलाखा बँका | १८०६ Bank of Calcatta, रूपांतर → १८०९ Presidency Bank of Bengal; १८४० Presidency Bank of Bombay; १८४३ Presidency Bank of Bengal — खाजगी बँका होत्या ईस्ट इंडिया कंपनीसाठी बँक व्यवसाय करीत होत्या. |
| १८८१ | अवध कमर्शिअल बँक → भारतीयांनी स्थापन केलेली पहिली बँक. |
| १८९४ | पंजाब नॅशनल बँक → १००% भारतीय मालकीची पहिली बँक |
| १९०५ | स्वदेशी चळवळ → स्वदेशी बँका स्थापन झाल्या. BOI, PNB, CBI आजही कार्यरत आहेत. |

| इलाखा बँका | | |
|---|---|---|
| १८०६ | Bank of Calcatta, रूपांतर | खाजगी बँका होत्या ईस्ट इंडिया कंपनीसाठी बँक व्यवसाय करीत होत्या. |
| १८०९ | Presidency Bank of Bengal | |
| १८४० | Presidency Bank of Bombay | |
| १८४३ | Presidency Bank of Bengal | |

| १९०५ | |
|---|---|
| १९०६ – १९१३ | ९८ बँका स्थापन |
| १९१३ – १९१७ | ८७ बँका बुडाल्या |

# 1 भारतीय सहकारी बँक व्यवसाय

## केंद्र सरकारचे कर महसूलाचे स्त्रोत

### सहकार व्याख्या




एच कलव्हर्ट यांच्या मते, आपल्या स्वत:च्या आर्थिक उन्नतीसाठी ज्यावेळी अनेक व्यक्ती स्वेच्छेने, समानतेच्या भूमिकेवरून मानवतेच्या नात्याने संघटित होतात, त्यास सहकार असे म्हणतात.

### सहकारी संस्थांचे प्रकार

| सहकारी संस्था | | | |
|---|---|---|---|
| पतसंस्था | | गैरपतसंस्था | |
| कृषि पतसंस्था | गैरकृषि पतसंस्था | कृषि गैरपतसंस्था | गैरकृषि गैरपतसंस्थ |
| ■ प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था.<br>■ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.<br>■ राज्य सहकारी बँक<br>■ भू-विकास बँका | ■ नागरी सहकारी बँका<br>■ पगारदार नोकरांच्या पतसंस्था<br>■ प्राथमिक शिक्षकांच्या पतसंस्था इ. | ■ सहकारी साखर कारखाने<br>■ सहकारी सुत गिरण्या<br>■ सहकारी दूध उत्पादक संस्था<br>■ सहकारी तेलप्रक्रिया संस्था<br>■ कृषी खरेदी-विक्री संघ<br>■ कृषी सहकारी पणन संस्था<br>■ प्राथमिक मच्छिमारी सहकारी संस्था. इ. | ■ सहकारी ग्राहक भांडारे.<br>■ सहकारी गृहनिर्माण संस्था.<br>■ पावरलुम विणकर सहकारी संस्था.<br>■ चर्मकार सहकारी संस्था.<br>■ कुंभार सहकारी संस्था इ. |

## भारतीय सहकारी बँक व्यवसाय



# 17 रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

**मध्यवर्ती बँक** →
- १६५६ → रिक्स बँक ऑफ स्विडन → जगातील पहिली मध्यवर्ती बँक
- १६९४ → बँक ऑफ इंग्लंड

↓

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया** →
1. **भारताची मध्यवर्ती बँक** → सर्वोच्च वित्तीय संस्था
2. **सरकारी मालकीची** → राजकीय हस्तक्षेपापासून दूर
3. **उद्देश नफा कमविणे नाही बँक** → व्यवस्थेचे/अर्थव्यवस्थेचे स्थैर्य
4. **व्यापारी बँकांशी स्पर्धा करीत नाही** → वेळोवेळी मदत

## RBI ची स्थापना व राष्ट्रीयीकरण

| | |
|---|---|
| **गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंगने** | जनरल बँक ऑफ बंगाल अँड बिहार नावाने स्थापन करण्याचा सल्ला. |
| **शिफारस** | हिल्टन यंग आयोग, १९२६ → 'दि रॉयल कमीशन ऑन इंडियन करन्सी अँड फायनान्स' |
| **कायदा** | RBI Act, १९३४ |
| **स्थापना व कार्ये सुरू** | १ एप्रिल, १९३५ → खाजगी क्षेत्रात म्हणजेच खाजगी भागधारकांची बँक म्हणून अधिकृत भाग भांडवल ५ कोटी रुपये व प्रत्येक भागाची किंमत १०० रुपये. |
| **एप्रिल १९३७ ते जून १९४२** | RBI ने ब्रह्मदेशाचे अधिकृत चलन नियंत्रण, एप्रिल १९३७ ते ३१ मार्च १९४७ – ब्रह्मदेश सरकारची बँक |
| **१५ ऑगस्ट १९४७ ते ३० जून १९४८** | RBI ने पाकिस्तानसाठी मध्यवर्ती बँक |
| **राष्ट्रीयीकरणाचा निर्णय/ उद्देश** | १. RBI च्या व सरकारच्या धोरणात सुसूत्रता असावी,<br>२. चलनविषयक व बँकविषयक प्रश्न योग्य रितीने हाताळले जावे,<br>३. RBI ची सत्ता काही व्यक्तींच्या हातात एकवटू नये इत्यादी |
| **कायदा** | ■ RBI (सार्वजनिक मालकीकडे हस्तांतरण) कायदा, १९४८ |
| **राष्ट्रीयीकरण** | ■ १ जानेवारी, १९४९ पासून RBI चे राष्ट्रीयीकरण कार्यान्वित.<br>■ तत्कालिन गव्हर्नर → सी.डी.देशमुख सुरूवातीला राष्ट्रीयीकरणाला विरोध. |
| **राष्ट्रीयीकरणासाठी** | ■ भारत सरकारने RBI च्या भागधारकांना १०० रुपयांच्या प्रत्येक भागासाठी ११८ रुपये १० आणे दिले → मात्र, RBI चे भाग भांडवल अजूनही ५ कोटी रुपये इतकेच आहे. |

# 18 भारतीय चलन व्यवस्था

## पैशाची व्याख्या

| | | |
|---|---|---|
| १. | प्रो. एफ. ए. वॉकर | जो पैशाची कार्ये करतो तो म्हणजे पैसा होय. |
| २. | डी.एच.रॉबर्टसन | पैसा म्हणजे असे काहीही जे वस्तूंच्या पेमेंटसाठी किंवा इतर प्रकारची वयावसायिक देणी देण्यासाठी व्यापकतेने स्विकारले जाते. |
| ३. | प्रो. क्राऊथर | पैसा म्हणजे अशी कोणतीही वस्तू जी विनिमय माध्यम म्हणून सर्वसाधारणपणे स्विकाहार्य असते, आणि जी त्यचबरोबर मूल्यमापनाचे व मूल्यसंचयाचे कार्य करते. |

## पैशाची कार्ये

**पैशाची कार्ये**

- **प्राथमिक कार्ये**
  - १.विनिमय माध्यम
  - २.मूल्यमापनाचे साधन
- **दुय्यम कार्ये**
  - १. विलंबित देणी देण्याचे साधन
  - २. मूल्यसंचय
  - ३. मूल्य हस्तांतरणाचे माध्यम
- **आकस्मिक/आनुषंगिक कार्ये**
  - १. राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी
  - २. सीमांत उपयोगिता व सीमांत उत्पादकता किंमतींबरोबर समान करणे.
  - ३. पतपैशाचा आधार
  - ४. संपत्तीय द्रवरूपता/रोखता देणे.
  - ५. समग्रलक्षी आर्थिक चलांचे मापन

## चलनाला पुढीलप्रकारे संबोधले जातेः

**प्रतिक/सांकेतिक चलन (Token Money)**

- दर्शनी किंमत > अंतर्भूत किंमत (प्रमाणिक चलन (Standard money) = दर्शनी किंमत = अंतर्भूत किंमत). १८९३ पर्यंत भारतात प्रचलित असलेला चांदीचा रुपया प्रमाणिक चलन होते.

**कायदेशीर चलन (Legal Tender) :** सरकारने/रिझर्व्ह बँकेने पुरस्कृत केलेले चलन. याचे दोन प्रकार आहेत.

**कायदेशीर चलन**

- **मर्यादित कायदेशीर चलन**
  - ५० पैशाची नाणी दहा रूपयांपर्यंत विधीग्राह्य
  - एक रूपया व अधिक मूल्याची नाणी १००० रू.पर्यंत विधीग्राह्य
- **अमर्यादित कायदेशीर चलन**
  - सर्व नोटांचा समावेश

- बँकांच्या मागणी ठेवी (Demand Deposits) ह्या कायदेशीर चलन नसतात, कारण धनादेशामार्फत केलेले पेमेंट नाकारता येते.

# 19 चलनवाढ

| | |
|---|---|
| **चलनवाढ** (Inflation) | ■ चलनवाढ = किंमतवाढ/भाववाढ/चलनविस्तार/मुद्रास्फिती असे इतर पर्यायी शब्दही वापरले जातात.<br>■ **अर्थ :** एखाद्या विशिष्ट कालावधीमध्ये (उदा. महिना किंवा वर्ष) वस्तू व सेवांच्या किंमत पातळीत होणारी अनियंत्रित वाढ म्हणजे किंमतवाढ होय. |
| **चलन घट** (Deflation) | ■ किंमत घटीला चलनसंकोच/किंमतघट/मुद्राअवस्फिती असेही म्हणतात.<br>■ **अर्थः** एखाद्या विशिष्ट कालावधीमध्ये वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी घट म्हणजे किंमत घट होय. |

| चलनवाढ/चलनविस्तार/किंमतवाढ/भाववाढ/मुद्रास्फिती | चलनघट/चलनसंकोच/किंमतघट/मुद्राअवस्फिती |
|---|---|
| 1. अर्थः एखाद्या विशिष्ट कालावधी मध्ये वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी सततची वाढ. | 1. अर्थः एखाद्या विशिष्ट कालावधीमध्ये वस्तू व सेवांच्या साधारण किंमत पातळीत होणारी सततची घट |
| 2. त्यामुळे चलनाची खरेदीशक्ती कमी होते. | 2. त्यामुळे चलनाची खरेदी शक्ती वाढते. |
| 3. वस्तू व सेवांची मागणी वाढलेली असते. | 3. वस्तू व सेवांची मागणी कमी झालेली असते. |
| 4. रोजगारनिर्मिती क्षमता वाढते. | 4. रोजगारनिर्मिती क्षमता कमी होते. |
| 5. त्यामुळे बेरोजगारी कमी होते. | 5. त्यामुळे बेरोजगारी वाढते. |
| 6. चलनवाढीचा फायदा ऋणकोंना, तर तोटा धनकोंना होतो. | 6. चलनघटीचा फायदा धनकोंना, तर तोटा ऋणकोंना होतो. |

## भाववाढीच्या मापन पद्धती

**दोन प्रमुख निर्देशांकांचा वापर केला जातोः**

1. घाऊक किंमतींचा निर्देशांक (Wholesale Price Index:)
2. ग्राहक किंमतींचा निर्देशांक (Consumer Price Index : CPI)

| घाऊक किंमत निर्देशांक (WPI) | ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) |
|---|---|
| १) WPI वस्तूंच्या घाऊक किंमतीवरून काढला जातो. | १) CPI वस्तूंच्या किरकोळ किंमतींवरुन काढला जातो. |
| २) WPI मध्ये फक्त वस्तूंच्या किंमतीचा समावेश होतो. | २) CPI मध्ये वस्तू तसेच सेवांच्या किंमतीचा समावेश होतो. |
| ३) WPI ६९७ वस्तूंच्या घाऊक किंमतींवरून काढला जातो. | ३) CPI मधील वस्तू मुख्यतः जीवनावश्यक वस्तू व सेवा गटातील असतात.म्हणून CPI ला Cost of living Index असेही म्हणतात. |
| ४) WPI मधील वस्तूंचे वर्गीकरण व भार : | ४) **जुनी CPI Series:** यामध्ये चार प्रकारचे CPI काढले जात असत. सध्या त्यांपैकी CPI(UNME) हा खंडित करण्यात आला आहे. त्यांमधील वस्तू-सेवांची संख्या व आधारवर्ष पुढीलप्रमाणे- |

| वस्तू | संख्या | भार |
|---|---|---|
| प्राथमिक वस्तू | ११७ | २२.६२ % |
| इंधन गटातील वस्तू | १६ | १३.१५ % |
| उत्पादित वस्तू | ५६४ | ६४.२३ % |
| **एकूण** | **६९७** | **१००%** |

| CPI चा प्रकार | वस्तू व सेवांची संख्या | आधारभूत वर्ष |
|---|---|---|
| CPI(IW) | ४६३ | २०१६ |
| CPI(AL) | ६० | १९८६-८७ |
| CPI(UNME) | १८० | १९८४-८५ |
| CPI(RL) | १८० | १९८६-८७ |

# 21 व्यापारतोल व व्यवहारतोल

| व्यापारतोल (Balance of Trade) | व्यवहार तोल (Balance of Payments) |
|---|---|
| ■ व्यापारतोल (BOT) → एका वर्षातील देशाच्या वस्तूंच्या आयात व निर्यात मूल्यांतील फरक. | ■ व्यवहारतोल (BOP) - देशाने इतर सर्व देशांशी केलेल्या सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थित मांडलेले रेकॉर्ड.<br>■ व्यापारतोलात फक्त वस्तूंच्या आयात-निर्यातीतून निर्माण होणाऱ्या येणी व देणींचा समावेश.<br>■ व्यवहारतोलात वस्तूंशिवाय सेवांच्या देवाण-घेवाणीतून तसेच कर्जे व गुंतवणुकीच्या व्यवहारांतून निर्माण होणाऱ्या येणी आणि देणी यांचाही समावेश. |

| | |
|---|---|
| निर्यात > आयात | व्यापारतोल अनुकूल = व्यापारशेष (+/धन) |
| निर्यात < आयात | व्यापारतोल प्रतिकूल = व्यापारतूट (-/ऋण) |

## व्यवहारतोलाची रचना

### चालू खाते

**दृश्य खाते किंवा व्यापार खाते**

वस्तूंच्या आयात-निर्यातीचे व्यवहार

**अदृश्य खाते**

या खात्यावर पुढील व्यवहार मांडले जातात.

१. सेवांची देवाणघेवाण. उदा. बँकिंग, विमा, शिपिंग, शिक्षण, पर्यटन, तांत्रिक सेवा, पोस्ट सेवा इ.

२. परकीय कर्जावरील व्याज, गुंतवणूक यांमधून मिळालेले उत्पन्न इ.

३. ट्रान्सफर पेमेंटस : परदेशस्थ भारतीयांनी देशात पाठविलेला पैसा (Remittances) तसेच, नातेवाईक, मित्रांना वगैरे दिलेल्या गिफ्टस इ.

### भांडवली खाते

या खात्यावर कर्ज व गुंतवणुकीचे व्यवहार मांडले जातात :

१. बाह्य मदत

२. बाह्य वाणिज्यिक कर्जे (ECBs)

३. अल्पकालिन कर्ज

४. बँकिंग भांडवल- ठेवी

५. परकीय गुंतवणूक

i. परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक (FDI)

ii. पोर्टफोलिओ गुंतवणूक (FPI)

६. इतर प्रवाह

## भारताचा व्यवहार तोल (BOP) (आकडे अब्ज $ मध्ये)

| | चालू खाते | | | भांडवली खाते |
|---|---|---|---|---|
| वर्ष | दृश्य खात्यावरील तोल (शेष/तूट) | अदृश्य खात्यावरील तोल (शेष/तूट) | चालू खात्यावरील तोल (शेष/तूट) | भांडवली खात्यावरील तोल (शेष/तूट) |
| १९९०-९१ | -९.४४ | -०.२४ | -९.६८ | +८.४० |
| २००१-०२ | -११.५७ | +१४.९७ | +३.४० | +८.५५ |
| २००२-०३ | -१०.६९ | +१७.०४ | +६.३४ | +१०.८४ |

# 22 आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा संस्था
## IMF आणि WB

| | |
|---|---|
| **दुसरे जागतिक महायुद्ध** | ■ युद्धात प्रत्यक्ष सहभागी राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचे अतोनात नुकसान<br>■ बहुपक्षीय व्यापार अस्ताव्यस्त<br>■ अर्थव्यवस्थांची पुनर्रचना व विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांचा योजनाबद्ध विकास घडवून आणण्याची गरज |
| **ब्रेटनवूड परिषद, १९४४** | ■ संयुक्त राष्ट्र चलनविषयक आणि वित्तीय परिषद<br>■ १ जुलै ते २२ जुलै, १९४४ दरम्यान<br>■ ब्रेटनवूड, न्यू हॅम्पशायर (यु.एस.ए.) येथे<br>■ ४४ देशांचा सहभाग |



**भारत संस्थापक सदस्य → सी.डी. देशमुख सहभागी झाले.**

**तीन प्रमुख मुद्द्यांचा विचार:**

| | |
|---|---|
| १. | विनिमय दराचे स्थैर्य व अल्पकालिन व्यवहारतोलाचे असंतुलन भेडसावणाऱ्या देशांना मदतीची तरतूद, |
| २. | विकासासाठी भांडवलाची उपलब्धता, आणि |
| ३. | वस्तूंच्या व्यापारातील अडथळे दूर करण्यासाठी उपाययोजना. |

**त्यासाठी अनुक्रमे तीन बहुपक्षीय संस्था स्थापन करण्याचा निर्णय:**

| | |
|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) |
| २. | आंतरराष्ट्रीय पुनर्बांधणी व विकास बँक (IBRD), आणि |
| ३. | आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (ITO). |

■ यांपैकी पहिल्या दोन संस्था स्थापन होऊ शकल्या, मात्र तिसरी संस्था अमेरिका व इतर विकसित देशांच्या विरोधामुळे स्थापन होऊ शकली नाही. म्हणूनच, या दोन संस्थांना 'ब्रेटन वूड जुळ्या संस्था' (Brettonwood Twins) असे संबोधले जाते.

### आंतरराष्ट्रीय नाणे निधी (International Monetary Fund: IMF)

| | |
|---|---|
| **स्थापनेचा निर्णय** | २२ जुलै, १९४४ रोजी ब्रेटन वूड्स परिषदेमध्ये |
| **स्थापना** | २७ डिसेंबर, १९४५ |
| **प्रत्यक्ष कार्य** | १ मार्च, १९४७ रोजी सुरू |
| **मुख्यालय** | वॉशिंग्टन डी.सी. |

**सदस्य संख्या :** १९० सदस्य (क्युबा, उत्तर कोरिया, व्हेटिकन सिटी, पॅलेस्टाईन इ. सदस्य नाहीत). **अलिकडील सदस्य:**

| | | |
|---|---|---|
| १. | **१८४ वा सदस्य** | ईस्ट तिमार (जुलै २००२) |
| २. | **१८५ वा सदस्य** | मॉंटीनेग्रो (जानेवारी २००७) |
| ३. | **१८६ वा सदस्य** | कोसोवो (जून २००९) |
| ४. | **१८७ वा सदस्य** | तुवालू (जून २०१०) |
| ५. | **१८८ वा सदस्य** | दक्षिण सुदान (१८ एप्रिल २०१२) |
| ६. | **१८९ वा सदस्य** | नौरू (१२ एप्रिल २०१६) |
| ७. | **१९० वा सदस्य** | अंडोरा (१६ ऑक्टेबर, २०२०) |

### जागतिक बँक गट (World Bank Group)

**जागतिक बँक गट → पाच आंतरराष्ट्रीय संस्थांचा गट.**

| | |
|---|---|
| 1. | International Bank for Reconstruction and Development.(IBRD) |
| 2. | International Development Association.(IDA) |
| 3. | International Finance Corporation.(IFS) |
| 4. | Multilateral Investment Guarantee Agency (MIGA) |
| 5. | International Centre for the Settlement of Investment Disputes.(ICSID) |

■ भारत ४ संस्थांचा सदस्य → IBRD, IDA, IFC आणि MIDA.

■ भारत ICSID चा सदस्य नाही.

■ भारत IBRD, IDA आणि IFC यांचा संस्थापक सदस्य, तर MIGA चे सदस्यत्व जानेवारी १९९४ मध्ये

# 1 जागतिक व्यापार संघटना (WTO)


## From GATT to WTO

- १९२९ –३४ → जागतिक मंदी
- १९३९–४५ → दुसरे महायुध्द
- 1-22 July, 1944 → **Brettonwood Conference**
- १९४५ → **IMF& IBRD** स्थापन , मात्र विकसित राष्ट्रांच्या विरोधामुळे **ITO** स्थापन होऊ शकली नाही.
  ↓
  पुढे अमेरिकेने जागतिक व्यापार व रोजगार वाढविण्याच्या दृष्टीने काही प्रस्ताव मांडले
  ↓
- 30 Oct, 1947 →
  - २३ देशांनी जिनिव्हा येथे GATT (General Agreement on Tariff & Trade) करार स्विकारला.
  - आयात व्यापारावरील Tariffs कमी करण्यासाठी एक अंतरिम व्यवस्था म्हणून
  - १ जानेवारी, १९४८ रोजी कार्यान्वित झाला.
  ↓
- 1963 → ITO स्थापन करण्याच्या विकसनशील राष्ट्रांच्या आग्रहामुळे UN ने एक समिती स्थापन केली.
  ↓
- 1964 → UNCTAD ची स्थापना

## GATT च्या फेऱ्या

| फेरी | वर्ष | ठिकाण | विषय | देश |
|---|---|---|---|---|
| I | १९४७ | जिनिव्हा | प्रशुल्के | २३ |
| II | १७४९ | ॲनेकी (फ्रान्स) | प्रशुल्के | १३ |
| III | १९५१ | टोर्क्वाय (UK) | प्रशुल्के | ३८ |
| IV | १९५६ | जिनिव्हा | प्रशुल्के | २६ |
| V | १९६०–६१ | जिनिव्हा (डिल्लॉन फेरी) | प्रशुल्के | २६ |
| VI | १९६४–६७ | जिनिव्हा (केनेडी फेरी) | प्रशुल्के, डंपिंग–विरोधी उपाय | ६२ |
| VII | १९७३–७९ | जिनिव्हा (टोकियो फेरी) | प्रशुल्के, प्रशुल्केतर उपाय | १०२ |
| VIII | १९८६–९४ | जिनिव्हा (ऊरुग्वे फेरी) | प्रशुल्के, प्रशुल्केतर उपाय, नियम, सेवा, कृषि, बौध्दिक मालमत्ता, तक्रार, निवारण, टेक्स्टाईल इ. | १२३ |

# 24 सार्वजनिक वित्त




| | | |
|---|---|---|
| **शासकीय अर्थसंकल्प** | **अर्थसंकल्प** | इंग्रजीमध्ये बजेट (Budget) असे म्हणतात. |
| | **बजेट हा शब्द** | ■ Bougettee या फ्रेंच शब्दापासून निर्माण झाला. त्याचा अर्थ 'चामड्याची पिशवी' असा होतो.<br>■ "बजेट" हा शब्द इंग्लंडमध्ये सर्व प्रथम १७३३ मध्ये वापरण्यात आला. |
| | **अर्थसंकल्पाची व्याख्या** | "पुढील आर्थिक वर्षातील सरकारच्या जमाखर्चाचे कायदेमंडळापुढे विचारार्थ ठेवलेले अंदाज." |
| | **भारतातील पहिला अर्थसंकल्प** | ७ एप्रिल, १८६० रोजी, जेम्स विल्सन या पहिल्या वित्त सदस्याने मांडला. |
| | **स्वातंत्र्यापूर्वीचा अंतीम अर्थसंकल्प** | १९४७-४८ चा, अंतरिम सरकारमधील वित्त सदस्य लियाकत अली खान यांनी मांडला. |
| | **स्वातंत्र्यानंतरचा पहिला अर्थसंकल्प** | २६ नोव्हेंबर, १९४७ रोजी, भारताचे पहिले वित्तमंत्री श्री. आर.के.शण्मुखम चेट्टी मांडला. |

| | | |
|---|---|---|
| **आर्थिक/वित्तीय वर्ष** | **१८६७ पूर्वी** | १ मे ते ३० एप्रिल |
| | **१८६७ पासून** | १ एप्रिल ते ३१ मार्च |
| | **एल्.के. झा समिती, १९८४** | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर अशा वर्षाची शिफारस, मात्र भारत सरकारने स्विकारली नाही. |
| | **शंकर आचार्य समिती, २०१६** | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर असे वित्तीय वर्ष स्विकारण्याची शिफारस केली. मात्र भारत सरकारने ती अजून स्विकारलेली नाही. |

# 26 भारतीय कर संरचना

| | |
|---|---|
| **करांची व्याख्या** | "जनतेच्या कल्याणासाठी शासनाला करावा लागणारा खर्च भागविण्याच्या हेतूने शासनाने लोकांकडून सक्तीने घेतलेली रक्कम म्हणजे कर होय." |
| **करांची वैशिष्ट्ये:** | 1. कर हे सक्तीचे देणे (compulsory levy) असते.<br>2. कर उत्पन्नाचा वापर शासन सार्वजनिक खर्च करण्यासाठी करते.<br>3. कराचा प्रत्यक्ष परतावा (direct quid pro quo) नसतो.<br>4. कलम २६५ → सरकारला कर आकारण्याचा अधिकार आहे → 'कायद्याने निश्चित केल्याशिवाय कोणताही कर आकारता येणार नाही किंवा वसूल केला जाणार नाही.' |

**कर कसोट्या**

| | |
|---|---|
| **आदर्श करपद्धतीसाठी कर कसोट्या** | **ॲडम स्मिथने म**Wealth of Nations' मध्ये पुढील कर कसोट्या सांगितल्या :<br>1. क्षमता (ability) 2. निश्चितता (certainty)<br>3. सोय (convenience) 4. मितव्ययता (economy). |
| **इतर कर कसोट्या** | **इतर अर्थतज्ज्ञांनी मांडलेल्या अन्य कर कसोट्या**<br>1. सुलभता 2. उत्पादकता 3. विविधता 4. लवचिकता 5. परिवर्तनीयता. |

**लॅफर वक्ररेषा**

- कराचा दर आणि त्यातून प्राप्त कर महसूल यांमधील संबंधांचे आलेखरुप प्रदर्शन म्हणजेच लॅफर वक्ररेषा होय.
- कराचा असा एक पर्याप्त दर असतो ज्यावेळी सरकारी कर महसूल महत्तम असतो.
- या पर्याप्त दरापेक्षा कराचा दर कमी किंवा जास्त असला तरी कर महसूल कमी प्राप्त होतो.

**करांचे वर्गीकरण**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | 1. प्रगतीशील कर<br>2. प्रमाणशीर कर<br>3. प्रतिगामी कर | २ | 1. प्रत्यक्ष कर<br>2. अप्रत्यक्ष कर | ३ | 1. विशिष्ट कर<br>2. मूल्यानुसारी कर |

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर यामधील फरक**

| | **प्रत्यक्ष कर** | **अप्रत्यक्ष कर** |
|---|---|---|
| **अर्थ** | कराची आकारणी व वसुली एकाच व्यक्तीकडून | कराची आकारणी व वसुली भिन्न व्यक्तींकडून |
| **स्वरूप** | पुरोगामी | प्रतिगामी |
| **कर भार/आघात** | एकाच व्यक्तीवर | भिन्न व्यक्तींवर |
| **आकारणी** | उत्पन्न/संपत्ती/भांडवली व्यवहार | वस्तूंचे उत्पादन/खरेदी/विक्री, सेवांचे प्रदान |
| **उदाहरणे** | आयकर, संपत्ती कर, भांडवली नफा कर इ. | जीएसटी, अबकारी कर, सीमा शुल्क इ. |
| **चलनवाढ** | चलनवाढीत घट | चलनवाढीत भर |
| **चुकवेगिरी** | शक्य | अवघड |

# 27 कृषि क्षेत्र

## भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषि क्षेत्राचे महत्व

### राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा

- स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी, कृषि व संलग्न क्षेत्राचा जी.डी.पी.मधील हिस्सा ५० टक्क्यांहून अधिक होता. त्यानंतर तो घसरत गेला.
- गेल्या काही वर्षातील भारताच्या GVA मधील कृषि व संलग्न क्षेत्राचा हिस्सा पुढीलप्रमाणे:

| **जी.व्ही.ए. मधील कृषि क्षेत्राचा हिस्सा** (चालू किंमतींनुसार) | |
|---|---|
| २०१७-१८ | १८.३ % |
| २०१८-१९ | १७.६ % |
| २०१९-२० | १८.३ % |
| २०२०-२१ | २०.३ % |
| २०२१-२२ | १९.० % |

- कृषि व संलग्न क्षेत्राचा जी.डी.पी.मधील घटता हिस्सा अर्थव्यवस्थेतील सकारात्मक संरचनात्मक बदल प्रदर्शित करतो.

### रोजगार निर्मितीत योगदान

- स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशातील ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या कृषि व संलग्न क्षेत्रांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून होती.
- मात्र, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासाबरोबर कृषिवरील अवलंबित्व कमी होत आहे.

**विविध जनगणनांनी दिलेले देशातील एकूण कामगारांपैकी कृषि कामगारांचे आकडे व टक्केवारी पुढीलप्रमाणे:**

| जनगणना | कृषि कामगार (दशलक्ष) | टक्केवारी |
|---|---|---|
| १९५१ | ९७.२ | ६९.७ % |
| १९६१ | १३१.१ | ६९.५ % |
| १९७१ | १२५.७ | ६९.७ % |
| १९८१ | १४८.० | ६०.५ % |
| १९९१ | १८५.३ | ५९.० % |
| २००१ | १३४.१ | ५८.२ % |
| २०११ | २६३.१ | ५४.६ % |

### परकीय व्यापारात योगदान

- पूर्वीपासूनच, भारत चहा, कॉफी, साखर, तंबाखू, कोको, सूती कपडे, ज्यूट, कच्ची लोकर, वनस्पती तेल इत्यादी पारंपरिक वस्तूंची निर्यात करत आहे.
- अलिकडे, अन्नधान्यांबरोबरच फळे व फुलांचीही निर्यात करीत आहे.
- १९९०-९१ पासून कृषि व संलग्न वस्तूंच्या आयातीचे प्रमाण एकूण आयातीपैकी २ ते ६ टक्क्यांच्या दरम्यान, तर निर्यातीचे प्रमाण एकूण निर्यातीपैकी १० ते २० टक्क्यांच्या दरम्यान बदलत राहिले आहे.

**गेल्या काही वर्षांतील भारताच्या एकूण आयात व निर्यातीतील कृषिचा हिस्सा पुढीलप्रमाणे:**

| वर्ष | एकूण आयातीतील हिस्सा(%) | एकूण निर्यातीतील हिस्सा(%) |
|---|---|---|
| १९९०-९१ | २.७९ | १८.४९ |
| २०००-०१ | ५.२९ | १४.२३ |
| २०१०-११ | ३.०३ | ९.९४ |
| २०१६-१७ | ६.३९ | १२.२६ |
| २०१७-१८ | ५.०७ | १२.८६ |

# 29 सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र

- भारताच्या औद्योगिक क्षेत्रात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राला महत्वाचे स्थान आहे.
- पूर्वी या क्षेत्राची गणना **'लघु उद्योग क्षेत्र'** म्हणून केली जात असे.
- २००६ मध्ये या क्षेत्राचे महत्व व योगदान ओळखून या क्षेत्राची व्याख्या व व्याप्ती विस्तारण्यात आली. त्यासाठी **'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६'** हा कायदा संमत करण्यात आला.
- **हा कायदा २ ऑक्टोबर, २००६ पासून लागू करण्यात आला.**
- या कायद्याद्वारे पूर्वीची **'उद्योग'** ही संकल्पना बदलून **'उपक्रम'** ही संकल्पना अस्तित्वात आली. त्यानुसार, उपक्रमांची ढोबळ मानाने १) वस्तू उत्पादक उपक्रम, आणि २) सेवा पुरविणारे उपक्रम या दोन प्रकारात विभागणी करण्यात आली.

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमः नवीन निकष

| उपक्रम | प्रकल्प व यंत्रसामुग्री किंवा साधनांमधील गुंतवणूक | उलाढाल |
|---|---|---|
| सूक्ष्म उपक्रम | < १ कोटी | < ५ कोटी |
| लघु उपक्रम | < १० कोटी | < ५० कोटी |
| मध्यम उपक्रम | < ५० कोटी | < २५० कोटी |

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राचे महत्व / योगदान

| | |
|---|---|
| १. | या क्षेत्राचे देशाच्या जी. डी. पी. मध्ये सुमारे ८ टक्के इतके योगदान आहे. |
| २. | कारखानदारी क्षेत्राच्या उत्पादनात या क्षेत्राचे योगदान सुमारे ४५ टक्के इतके आहे. |
| ३. | देशाच्या एकूण निर्यातीत या क्षेत्राचे योगदान सुमारे ४० टक्के इतके आहे. |
| ४. | या क्षेत्रात सुमारे देशभरातील २६१ लाख उपक्रमांमध्ये सुमारे ५९५ लाख व्यक्ती रोजगारात गुंतलेले आहे. हे क्षेत्र स्वयंरोजगारासाठी तसेच मजुरी रोजगारासाठी उत्तम संधी उपलब्ध करून देते. |
| ५. | या क्षेत्राचा वृद्धी दर हा उर्वरीत औद्योगिक क्षेत्राच्या वृद्धी दरापेक्षा नेहमी अधिकच ठरला आहे. |
| ६. | या क्षेत्रात परंपरागत वस्तूंपासून तर हाय-टेक वस्तूंपर्यंत सुमारे ६००० वस्तूंचे उत्पादन केले जाते. |
| ७. | उच्च श्रम-कामगार प्रमाण, उच्च वृद्धी आणि उच्च विखुरलेपणा, या वैशिष्ट्यांमुळे हे क्षेत्र समावेशी वृद्धीचे उद्दिष्ट्य प्राप्त करण्यासाठी निर्णायक आहे. |

## विकासासाठी धोरणात्मक उपाययोजना : संस्थात्मक यंत्रणा

| | |
|---|---|
| **सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम मंत्रालय** | ■ सु.ल.म. उपक्रमांच्या वृद्धी व विकासासाठी नोडल एजन्सी<br>■ लघु उद्योगांच्या विकासासाठी तसेच त्यांची स्पर्धात्मकता सुधारण्यासाठी धोरणे व कार्यक्रम तयार करते व अंमलात आणते.<br>**पुढील सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम मदत करतात** |
| **लघु उद्योग विकास संघटना (SIDO)** | **Small Industry Development Organisation:**<br>■ मंत्रालयाला लघु उद्योगांच्या विकासाबद्दल धोरणे/कार्यक्रम/प्रकल्प तयार करणे व त्यांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणे, यांसाठी मदत करणारी सर्वोच्च बॉडी आहे. |

30

# अर्थसंकल्प आणि आर्थिक पाहणी अहवाल

## केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23

- भारतीय अर्थव्यवस्था जगात ५व्या क्रमांकाची आहे
- २०२२ यूपीआय द्वारे १२६ लाख कोटी रुपयांची ७४०० कोटी डिजिटल पेमेंट
- ईपीएफओ (EPFO) सदस्य संख्या २७ कोटी
- स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय संख्या-- ११.७ कोटी
- उज्वला योजनेअंतर्गत ९.६ कोटी एलपीजी कनेक्शन पूर्ण
- १०२ कोटी व्यक्तींचे २२० कोटी कोविड लसीकरण
- पी एम किसान सन्मान निधी अंतर्गत ११.४ कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांना २.२ लाख कोटी रुपयांची रोख हस्तांतरण

### सात प्रधान्यक्रम सप्तर्षी

| | |
|---|---|
| १. | सर्वसमावेशक विकास |
| २. | विकास देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचविणे |
| ३. | पायाभूत सुविधा |
| ४. | क्षमतांना संधी देणे |
| ५. | हरित वृद्धी |
| ६. | युवा शक्ती |
| ७. | आर्थिक क्षेत्र |

### कृषी प्रवेगक निधी (Agriculture Accelerator Fund)

- **उद्देश–** ग्रामीण भागातील तरुण उद्योजकांच्या कृषी Startup ला प्रोत्साहन देणे.
- **उद्दिष्ट–** शेतकऱ्यांपुढील आव्हानांसाठी नाविन्यपूर्ण आणि परवडणारे उपाय देणे.

### इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट रिसर्च– हैदराबाद

- या संस्थेला भरडधान्याचे (श्री अन्नाचे) जागतिक केंद्र बनवण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोत्तम पद्धती संशोधन व तंत्रज्ञान शेअर करण्यासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून सहाय्य केले जाईल

### कृषी कर्ज

- **लक्ष–** २० लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवले जाईल
- **पीएम मत्स्य संपदा योजनेची उपयोजना–** ६००० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह सुरू करणार
- २५१६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ६३०० कोटी **प्राथमिक कृषी पतसंस्थांचे संगणकीकरण** सुरू
- आरोग्यावरील खर्च GDP च्या २.१%. (२०२३-२४)
- २०४७ पर्यंत सिकल सेल ॲनिमियाचे उच्चाटन करण्यासाठी अभियान सुरू करणार
- शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या २.९%

### आकांक्षा ब्लॉक कार्यक्रम

- **उद्देश–** आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, जलसंपत्ती, आर्थिक समावेशन, कौशल्य विकास व मूलभूत पायाभूत सुविधा या क्षेत्रात सरकारी सेवांच्या प्रचारासाठी सुरूण
- यात ५०० तालुके समाविष्ट करणार

### पीएम PVGT विकास अभियान

- **उद्देश–** असुरक्षित आदिवासी गटांची सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारणे
- **तरतूद–** १५००० कोटी रुपये

**दुष्काळग्रस्त भागासाठी पाणी**

- कर्नाटकातील अप्पर भद्रा प्रकल्पाला ५३०० कोटींची मदत
- **पीएम आवास योजना –** खर्च ६६% ने वाढवून ७९००० कोटी रुपये करणार
- **भारत श्री –** प्रथम टप्प्यात एक लाख प्राचीन शिलालेखांचे डिजिटलायझेशन करणे
- **पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक –** भांडवली गुंतवणुकीची तरतूद सलग तिसऱ्या वर्षी ते ३३% म्हणजेच १० लाख कोटी रुपये पर्यंत वाढवली जात आहे ती जीडीपीच्या ३.३% आहे.
- **प्रभावी भांडवल खर्च** अंदाजित १३.७ लाख कोटी (GDP च्या ४.५%)

### रेल्वे

- २.४० लाख कोटीचा भांडवली खर्च जाहीर (२०१३-१४ मध्ये खर्चाच्या ९ पट)
- **संरक्षण –** ५.९४ लाख कोटींची तरतूद

### LAB GROWN DIAMOND (LGD)

# 30 IMP PYQ FACT

## १. भारतीय अर्थव्यवस्था

- **जॉन फ्रीडमन :–** व्यवस्थेच्या मूळ रचनेत बदल न होता तिच्या एक किंवा अनेक क्षेत्रात झालेला विस्तार म्हणजे आर्थिक वृद्धी होय.
- **दांडेकर समिती १९८३ :–** महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करण्यासाठी स्थापन
- **थॉमस पिक्केटी :** पुस्तक– कॅपिटल विकसित जगामध्ये तीव्र असमानतेचा उदय
- **जॉन मेनार्ड केन्स :**
  - **पुस्तक :–** GENERAL THEORY OF EMPLOYMENT INTREST AND MONEY.
- **कार्ल मार्क्स :–** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील विचार.
  - भांडवल टंचाई
  - गुंतवणूक निर्णय
  - नफ्याचा दर
  - तांत्रिक प्रगती
- **रोस्टो :**
  - **पुस्तक :–** STAGE OF ECONOMIC GROWTH.
  - प्रादेशिक वृद्धीसाठी पूर्व अट – सामाजिक वरकड भांडवल
- संतुलित वृद्धी सिद्धांतानुसार अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांमध्ये संतुलनाची गरज असते.

### शुम्पीटर यांच्या मते :–

- **विकास म्हणजे** स्थितिशील स्थितीत खंडित आणि उत्स्फूर्त बदल होय.
- **वृद्धी म्हणजे** क्रमश आणि स्थिर दीर्घकालीन बदल जो हळुवार बचत आणि लोकसंख्या वाढीमुळे होतो.

### प्राध्यापक लेवीस :–

- आर्थिक विकास म्हणजे दरडोई उत्पन्नात वाढ होणे होय.
- महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न देशाच्या दरडोई उत्पन्नापेक्षा जास्त आहे.

### आर्थिक विकासातील बिगर आर्थिक घटक

- मानवी संसाधने
- तांत्रिक शिक्षण
- राजकीय स्वातंत्र्य

### भारतीय शेतीच्या कमी उत्पादकतेची कारणे:–

| | |
|---|---|
| १. | लोकसंख्येचा अभाव |
| २. | अनुत्पादक धारण क्षेत्र |
| ३. | अपुऱ्या सिंचन सुविधा |

- महामारी संबंधित संकटाचा सर्वात कमी परिणाम कृषी क्षेत्रावर झाला.
- सेवा क्षेत्राच्या उत्पादनाच्या तुलनेत रोजगारातील वाढ कमी दराने झाली आहे.
- १९९० च्या काळात सेवा क्षेत्रातील रोजगार वृद्धीपेक्षा भारतातील श्रमिकांची सरासरी उत्पादकता वृद्धी जास्त होती.
- २०१३–१४ देशांतर्गत उत्पादनात सेवा क्षेत्राचा हिस्सा ५९.९% .
- नियोजनाच्या नंतरच्या टप्प्यांमध्ये १९८१ ते २०१२ या काळात सरासरी स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर ५.९% होता

### देशाच्या आर्थिक विकासाचा दर खालील बाबीवर अवलंबून असतो.

| | |
|---|---|
| १. | शिक्षण आणि संशोधन |
| २. | भांडवल आणि नैसर्गिक साधने |
| ३. | आंतरराष्ट्रीय व्यापार व शांतता |
| ४. | शेती आणि सिंचन |

- २००४–०५ च्या किमतीनुसार २०१० –११ मध्ये निव्वळ घरगुती उत्पादनात तृतीय क्षेत्राचा वाटा ६०.३% होता.
- १९५०–५१ ते २०१०–११ या काळामध्ये प्राथमिक क्षेत्राचा स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ५५.४% ते १४.३% इतक्या प्रमाणात घसरला.
- अर्थव्यवस्था विकसित होत असताना देशाची व्यावसायिक रचना साधारणपणे द्वितीय तृतीय क्षेत्राच्या बाजूने बदलते.

### भारतीय शेतीचे उत्पादकता प्रामुख्याने दोन बाबीवर अवलंबून आहे.

- १) तांत्रिक घटक २) संस्थात्मक घटक
- **विभागीय असंतुलन दूर करण्यासाठीचे उपाय.**

| | |
|---|---|
| १) | साधनसंपत्तीचे हस्तांतरण. |
| २) | खास क्षेत्रीय विकास कार्यक्रम |
| ३) | मागास भागात गुंतवणुकीला चालना |

# MPSC

भगीरथ™
IAS Academy
UPSC • MPSC

## राज्यसेवा परीक्षा

### पूर्व + मुख्य + मुलाखत

बदलता अभ्यासक्रम आणि परीक्षा पद्धतीनुसार

Optional Subjects Available

## OFFLINE BATCH

1 YEARS INTEGRATED BATCH

BATCH TIME
स. 8 ते 12

BATCH STARTS **24 JUNE 2024**

**By : RANJAN KOLAMBE Sir & TEAM**

भगीरथ™
IAS Academy
UPSC • MPSC

Add : Aakruti Sankul, Behind Maharashtra Bank, Tilak Road, Pune
Add : 2nd Floor, Kesariwada, Narayan Peth, Pune : 411030
Ph. No.: 9970298197 I 9090906777